PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Jamla ho Jamla
Year: 1995

Song: tu mala tula me disle
Lyricist:

तू मला तुला मी दिसले
हं...
मन माझे तरीही रूसले
हं...
तू मला तुला मी दिसले
मन माझे तरीही रूसले
का प्रेम हे मनातले मनातच दडले
धक धक धक मनात होते
धक धक मन ओढ ही घेते
धक धक धक मनात होते
धक धक मन ओढ ही घेते
आभाळी रंग उधळले
सोनेरी ऊन ही पडले
का सूर ते गळयातले ओठावर आले
कुहुकुहुकुहु कोकीळ गाते
कुहुकुहु कोकीळ बोलवते
धक धक धक मनात होते
धक धक मन ओढ ही घेते

देई हा मोर इशारा फुलवे पिसारा
सागर राजा आला कुणाला
मेघाचे भरले डोळे गालावर ओघळे
थेंब टपोरा तुझ्या प्रेमाचा
थेंबाचे मोती झाले
धरतीवर आज बरसले
का प्रेम हे ऊरातले सुगंधित झाले
रिमझिम रिमझिम सर येते
रिमझिम सर सुरात न्हाते
धक धक धक मनात होते
धक धक मन ओढ ही घेते
हं...

येई हा अवखळ वारा वाहे भरारा
पानोपानी येई शहारा
ह्या नाजूक पानावरती
रंग बहरती
कळी उमलता येई फुलोरा
तालावर निर्झर बोले
मन माझे पैंजण झाले
का बोल ते तालातले
पायात उतरले
छुम छुम छुम पाऊल पडते
छुम छुम पाऊल का अडते
धक धक धक मनात होते
धक धक मन ओढ ही घेत
धक धक धक मनात होते
धक धक मन ओढही घेत
धक धक धक मनात होते
धक धक मन ओढही घेत
धक धक धक मनात होते
धक धक मन ओढही घेत

Literacy for a Billion

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*